Vol 6 Issue 2 August 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 2 | August - 2016

GRT Golden Research Thoughts

# डॉ. राममनोहर लोहिया आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली जातींची मीमांसा

प्रा.डॉ.भगवान माने
राज्यशास्त्र विभाग आणि संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.




**प्रस्तावना–**

डॉ. राममनोहर लोहिया यांच्या विचारातून वैश्विक मानवतेचे दर्शन घडते. लोहिया म्हणजे समाजवादी चळवळीचा दिपस्तंभ होय. देशातील उपेक्षित समाज, दबलेल्या जाती, कष्टकरी श्रमजीवी समाजाच्या न्यायासाठी ते अखंड झगडले. त्यांनी राजकारण समाजकारण आणि अर्थकारणाला संघर्षाचे माध्यम मानले होते. मतपेटी, तुरूंग आणि फावडे या तीन प्रतिकाद्वारे नवसमाज निर्मितीचे ते स्वप्न पाहत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीचे उपासक होते. सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी राज्यसमाजवादी व्यवस्थेचा आग्रह धरलेला होता. देशातील अस्पृश्य समाजाला स्वातंत्र्य ,समता आणि न्याय प्राप्त होण्यासाठी त्यांनी हिंदूजातीव्यवस्थेवर प्रहार केला. अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी 'शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा ' हा महान संदेश दिला. जातीप्रथेचा उगम आणि स्वरूपाचा शोध घेऊन जाती व्यवस्था नष्ट करणे हे त्यांनी आपल्या आयुष्याचे प्रमुख कार्य मानले होते. डॉ. राममनोहर लोहिया आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'जाती' संस्थेबद्दल सडेतोड निर्भीड, विवेकनिष्ठ आणि वैचारिक मते मांडली देशातील गरिबी, दारिद्रय सामाजिक विषमता याचे मूळ जातीव्यवस्था असून जाती संस्था नष्ट केल्याशिवाय सामाजिक समता निर्माण होणार नाही. यावर त्यांचा दृढविश्वास होता. जाती याच आपल्या विनाशाचे मुख्य कारण आहेत. यावर डॉ. आंबेडकर आणि लोहिया यांचे एकमत होते. डॉ. राममनोहर लोहिया महात्मा गांधीजींचे शिष्य होते. परंतु 'जाती' संबंधी विचार मांडताना त्यांनी महात्माजींच्या पुढे जाऊन जातीसंबंधी विचार मांडले आहेत. परंतु त्यांनी अध्यात्मवाद किंवा दैवीसिद्वांताचा अथवा अराज्यवादाचा आधार घेतलेला नाही. महात्माजींची अस्पृश्योद्वाराची चळवळ भूतदयेवर, सहानुभूतीवर आधारित होती. जातीव्यवस्था नाहीशी करण्याबाबत त्यांच्या विचारांत स्पष्टता दिसून येत नाही. परंतु डॉ. राममनोहर लोहिया यांनी जातीव्यवस्था नष्ट केली पाहिजे. याबाबत सडेतोड विवेकनिष्ठ भूमिका मांडली आहे. जातीव्यवस्थेमुळे भारताचे अपरिमित नुकसान होत आहे. त्यामुळे जाती नष्ट केल्या पाहिजेत अशी त्यांनी आग्रही भूमिका घेतली होती. भारतीय समाजातील जातींना त्यांनी कैदखाना अशी उपमा दिली आहे.

जातीप्रथा ही केवळ भारतात नसून जगात वेगवेगळया प्रकारे जातीचे अस्तित्व दिसून येते. जातीमध्ये बदल होतात,परंतु भारतामध्ये जातीला धर्माचे अधिष्ठान प्राप्त झाल्यामुळे वर्ग बदलला तरी त्याची जात बदलत नाही. असे मत डॉ. लोहियांनी व्यक्त केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जाती संबंधी मांडलेले विचार आणि डॉ. राममनोहर लोहिया यांनी वर्ग बदलला तरी जात बदलत नाही हा मांडलेला विचार यामध्ये जातीच्या विश्लेषणात साम्य दिसून येते. कप्पेबंद जातीव्यवस्थेसंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की ' हिंदुधर्मात समाविष्ट होणा–या जाती उच्च – नीच भावनेने प्रेरित आहेत. हिंदुसमाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजलाच होय. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे की, या मनो–यास शिडी नाही. आणि म्हणून एका मजल्यावरून दुस–या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला इसम मग तो कितीही लायक असो त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही. व वरच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची कोणाची प्रज्ञा नाही.[1]

यावरून असा निष्कर्ष काढता येतो, की लोहियांनी जातीला कैदखाना म्हटले आहे आणि डॉ. आंबेडकर यांनी जातीला कप्पेबंद व्यवस्था म्हटले आहे. त्यामुळे जातीवर्णनात दोघांमध्ये साम्य आढळते जातीच्या निर्मितीसंबंधी डॉ. लोहियांचे विचार मूलगामी असून ते असे म्हणतात, ''समाजातील विभिन्न वर्गाचे समाजातील योग्य स्थान आणि कलह परस्पर नाहिसा करण्याच्या हेतूने जातीची निर्मिती झाली आहे. वर्ग आणि जाती यांत फरक असून परिवर्तन जाती म्हणजे वर्ग आणि परिवर्तनीय वर्ग म्हणजे जाती होय.''[2] जातीव्यवस्थेमुळे समाज सुस्त, निष्प्राण, गतिहीन आणि थंड गोळयाप्रमाणे निष्क्रिय व उदासिन झाला आहे. देशाच्या अंतर्बाहय व्यवस्थेची अवनती झाली असून भारतीय संस्कृतीला जातीचा घातक वारसा लाभल्यामुळे जातीव्यवस्था नष्ट करणे आवश्यक असल्याचे डॉ. लोहिया प्रतिपादन करतात. यावरून असे सिद्व होते की, दोघाही विचारवंतांनी जातीसंस्थेमुळे भारतीची प्रगती खुंटली आहे आणि राष्ट्रवादी भावना निर्माण होण्यामध्ये जात अडथळा ठरते. अशी केलेली मीमांसा रास्तच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चातुवर्ण्य व्यवस्थेच्या केलेल्या मीमांसेमधून जातीची विशुध्द मांडणी स्पष्ट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जानेवारी 1936 मध्ये लाहोरच्या जातपात तोडक मंडळाच्या वार्षिक संम्मेलनात बोलविले होते. परंतु संयोजकांनी जातीव्यस्थेवर सडेतोड बोलू नका, अशी अट घातल्यामुळे डॉ. आंबेडकर यांनी निमंत्रण नाकारले मात्र त्यांनी तयार केलेल्या भाषणाची पुस्तिका पुन्हा छापण्यात आली. त्यामधून त्यांचे जातीसंबंधीचे मूलभुत,शास्त्रशुध्द विचार स्पष्ट होतात. जातीसंबंधी ते असे म्हणतात,

'हिंदू समाज हा आरंभी चार वर्णात विभागलेला होता. वर्ण हा माणसाच्या सत्यावर आधारलेला असे काही काळानंतर वर्ण हा जातीवर आधारला गेला. चार वर्णाचे रूपांतर चार जातीत झाले. जातिभेद व्यवस्था ही एकाच वंशाच्या लोकांची सामाजिक विभागणी आहे. ती केवळ श्रमाची विभागणी करते असे नाही. तर ती श्रमिकांचीसुध्दा विभागणी करते. एखादया मनुष्यास जो धंदा आवडत नाही. तो करण्यास ती त्याला भाग पाडते. हिंदुसमाजाची चातुवर्ण्य व्यवस्थेच्या पायावर पुर्नरचना करणे अशक्य आणि अपमानकारक आहे. कारण चातुवर्ण्य व्यवस्थेला अशी खोड आहे की, तिचा अपकर्ष निरनिराळया जाती बनण्यातच होतो. [3] वर्णव्यवस्थेनुसार शुद्राला आपल्या नैसर्गिक प्रवृत्तीनुसार आर्थिक उत्पादनांचा कामधंदा करता येत नाही, तो समाजव्यवस्थेविरूध्द बंड करू शकत नाही आणि निरंतर गुलामगिरीत राहणे हे आपले पूर्वसंचित आहे. अशी शुद्रानी आपली समजूत करून घेतली आहे. या चुकीच्या समजुतीमधून बाहेर पडण्यासाठीच डॉ. आंबेडकर यांनी हिंदु धर्माचा त्याग करून बौध्दधम्माचा स्वीकार केला.

परकिय आक्रमणामुळे हिंदुस्थानचा सतत पराभव झाला. याचे मूळ कारण चातुवर्ण्यव्यवस्था आहे. या अनुषंगाने डॉ. लोहिया यांनी हिंदुस्थानच्या पराभवाची मीमांसा पुढीलप्रमाणे केली आहे.

'चातुवर्ण्य व्यवस्थेत क्षत्रियांनी फक्त युध्द करावे ही शिकवण असल्यामुळे ब्राम्हण, वैश्य आणि शुद्र या वर्गांना आपले शौर्य दाखविता आले नाही. त्यामुळे तीन चतुर्थापेक्षा अधिक समाज युध्दापासून दूर राहिला त्यामुळे आमच्या पराभवाच्या कारणांपैकी जाती आणि वर्णव्यवस्था हे एक कारण आहे.' [4] डॉ. आंबेडकर भारताच्या पराभवाची मीमांसा करताना असे म्हणतात ' चातुवर्ण्य व्यवस्थेमुळे भारतीय लोक मोठया प्रमाणावर कायमचे पंगू झाले आहेत. जगातील इतर देशात मोठ–मोठया क्रांत्या झाल्या, परंतु भारतात क्रांती झाली नाही. याचे महत्वाचे कारण म्हणजे चातुवर्ण्य व्यवस्था होय. त्यामुळे हिंदूमधील खालचे वर्ग कोणतीही प्रत्यक्ष कृती करण्यास असमर्थ ठरले. ते हातात शस्त्र धरू शकले नाहीत. आणि हातात शस्त्र धरण्याशिवाय क्रांती करणे शक्य नाही. ' [5]

डॉ. आंबेडकर आणि डॉ. लोहिया यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, भारताच्या पराभवाच्या अनेक कारणांपैकी जात हे पराभवाचे प्रभावी कारण असल्याचे म्हटले आहे. हिंदुस्थानातील तसेच जगातील जात आणि वर्गासंबंधी डॉ. लोहिया यांनी पुढीलप्रमाणे मीमांसा केली आहे. 'जगभर या ना त्या स्वरूपात जात आणि वर्ग संघर्ष घडून येतात. जात म्हणजे, गोठून गेलेला वर्ग, आणि वर्ग म्हणजे प्रवाही जात होय. समाज उत्कर्षाच्या वाटेवर असताना, जात प्रवाही बनून तिचे वर्गात रूपांतर होते. आणि देशाची अवनीती होताना वर्ग गोठले जाऊन त्यांची जात बनते. जगातील इतर देशात जन्मावर आधारित जात आढळत नाही. ती फक्त हिंदुस्थानात आढळते. हिंदुस्थानातील जातीव्यवस्थेचे भोंगळ स्वरूप असल्याने जनता प्रतिकारशून्य आणि गुलाम झाली आहे.

जातीच्या उगमासंबंधी डॉ. आंबेडकर यांनी मीमांसा केली आहे, की वंश सामूहिक (स्थानिक) किंवा वांशिक (रेसिअल) नाहीत. भारतीय समाज वांशिक अथवा वंश सामूहिकदृष्टया विशुध्द नव्हता. तो वाशिकदृष्टया बहुजिनसी (हेटरोजिनिअस)आणि संमिश्र स्वरूपाचा होता. [6] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'जात' संस्थेच्या मांडलेल्या सिध्दांताविषयी मधु लिमये असे म्हणतात,' जातिप्रथेवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली जातीची मीमांसा ही बिनतोड युक्तीवादावर आधारलेली आहे. डॉ. आंबेडकरांनी त्यात भावनेचे धगधगते अंगार अशा पद्वतीने ओतले आहेत. की त्यांची तुलना कार्लमार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स यांच्या 'कम्युनिस्ट मॅनिफॅस्टो' शी होऊ शकते. ' [7] जाती नष्ट करण्यासाठी संमिश्र जातीमध्ये विवाह घडवून आणणे हा महत्वाचा पर्याय मानला जातो.

जातीभेदांचे निर्मूलन होण्यासाठी रोटीबेटी व्यवहार घडवून आणले पाहिजेत व्यक्तीमध्ये समानतेची भावना वाढीस लागण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. राममनोहर लोहिया यांनी मांडलेले विचार वस्तुनिष्ठ आणि समाजपरिवर्तनाचे आहेत. रोटी–बेटी व्यवहाराच्या संबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात. की, केवळ सहभोजनाने जातीभेद नष्ट होणार नाहीत. बेटी व्यवहार सुरू झाल्याशिवाय जातीभेद मोडणार नाही. ही विचारसरणी जातीभेद मोडावा असे प्रतिपादन करणा–या लोकांना मान्य आहे. पण आस्ते कदम म्हणून आधी जातीजातीत रोटी व्यवहार सुरू करावा असा त्यापैकी ब–याच लोकांचा आग्रह दिसतो. तो झाल्याने जातीभेद लयास जाईलच असे सांगता येत नाही. खुद्द ब्राम्हण जातीत अशा अनेक जाती आहेत, की ज्यांत परस्पर रोटीव्यवहार भेद शिल्लक राहून जातीभेदाच्या वृक्षाचा परिपोष व्हावयाचा तो होतोच. बेसुमार वाढलेले निवडुंगाचे काटेरी कुंपण जर नको असेल तर त्याची छाटाछाट करून कार्यभाग होणार नाही. ते सर्व मुळापासून उपटून टाकले पाहिजे तशीच गोष्ट जातीभेदाची आहे'. जातीभेदाच्या इमारतीचा पाया बेटीबंदीवरती उभारलेला आहे. रोटीबंदीवरती उभारलेला नाही. तेव्हा जातीभेदाची इमारत उध्वस्त करून टाकावयाची असेल तर प्रथमतः बेटीबंदी वरती गदा घातली पाहिजे[8]

डॉ. राममनोहर लोहिया यांनीसुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विश्लेषणाप्रमाणेच रोटीबेटी व्यवहारासंबंधी जातींचे वास्तव विश्लेषण केले. आहे. यासबंधी ते असे म्हणतात, की ' विचार आणि कृती यात भेद मानणे ही भारतीय संस्कृतीची विशेषता आहे. ही प्रवृत्ती जातीप्रथेतून निर्माण झाली. आहे, की काय कोण जाणे जातीची चौकट ही अशी न तोडता येणारी आहे. आतापर्यंत जातिनिर्मूनाचे काम रोटी व्यवहाराच्या छोटया मर्यादित क्षेत्रातच झाले. बेटी व्यवहारापर्यंत ते पोचले नाही. ही फार मोठी चूक आहे. जातीजातीत रोटी व्यवहार होत असतो. ही समजूत देखील बरीचशी भ्रामक आहे. उच्चवर्णीयांच्या विभिन्न जातीमध्येच कधी कधी रोटीबेटी व्यवहार होत असतो. ख–याखु–या सामुदायिक व्यवहाराच्या बहुदा अन्य सर्व क्षेत्रात उच्चवर्णीय आणि कनिष्ठ वर्णीय हा भेद अद्यापक कायम आहे. आंतरजातीय विवाहाची चर्चा लोक करतात. परंतु त्यांना वरिष्ठ जातीमधील विवाहच अभिप्रेत असतात. जगामध्ये जात हा सर्वात मोठा आधार, सर्वात मोठा विमा आहे. जातीचा हा विमा उतरविण्यासाठी कोणालाही एक छदामही द्यावा लागत नाही. ' [9] यावरून डॉ. लोहियांनी केलेली जातींची मीमांसा विवेकनिष्ठ आणि वास्तव आहे याची जाणीव होते.

## जातीव्यवस्थेच्या उच्चाटनासाठी डॉ. आंबेडकर आणि डॉ. लोहिया यांचे विचार

डॉ. बी.आर. आंबेडकर आणि डॉ. राममनोहर लोहिया आणि जाती वर्ग यांच्या उत्पत्ती संबंधी केवळ मते मांडली नाहीत तर

जातीव्यवस्थेचे उच्चाटन कसे करता येईल यासाठी उपायही सुचविले आहेत.

जाती व्यवस्थेच्या उच्चाटनासाठी डॉ. आंबेडकर यांना हिंदुसमाजाच्या नैतिक पुनरूज्जीवनाची आवश्यकता वाटत होती. हिंदू समाजाला स्वातंत्र्य, समता, बंधुभाव यासंबंधीचे तात्विक अधिष्ठान दिले पाहिजे हिंदुसमाज एकवर्णी बनला तरच तो सुरक्षित राहिल असेही त्यांनी मत व्यक्त केले आहे. डॉ. लोहिया जाती उच्चाटनासाठी म्हणतात, समाजीतील जातीप्रथेच्या उच्चाटणासाठी सर्वजण बोलतात, परंतु मनापासून त्यासाठी प्रयत्न केले जात नाहीत. जातीव्यवस्थेअंतर्गत असणारे सहकार्य, जातीतील माणसांना करण्यात येणा—या सहकार्यामुळे जाती उच्चाटणासाठी अडचणी येतात. तरीसुध्दा आपण शरण न मानता जाती संस्थेच्या उच्चाटणासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

### संदर्भ सुची :—

1 डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायकः मुंबई, शनिवार ता. 31 जानेवारी 1920, अंक 1 ला.
2 लोहिया डॉ. राममनोहर : दोन हत्यारे सत्ताधा—यांची भाषा आणि जाती, प्रेस्टीज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 1971, पृ. 67
3 किर धनंजय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पृ. 278.
4 लोहिया डॉ. राममनोहर : दोन हत्यारे सत्ताधा—यांची भाषा आणि जाती, प्रेस्टीज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 1971, पृ. 72
5 लिमये मधु : अनुवाद अमरेंद्र नंदू धनेश्वर : डॉ. आंबेडकर एक चिंतन, रचना प्रकाशन पुणे,ऑक्टोबर 1986, पृ. 24.
6 उपरोक्त पृ. 17
7 उपरोक्त पृ. 1 ते 6
8 लोहिया डॉ. राममनोहर : दोन हत्यारे सत्ताधा—यांची भाषा आणि जाती, प्रेस्टीज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 1971, पृ. 71.



*प्रा.डॉ.भगवान माने*
*राज्यशास्त्र विभाग आणि संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org